# मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./ २१ /२०११

परिपत्रक:

विषय :- शिक्षक व शिक्षकेतर पदांच्या बिंदुनामावल्या ( Roster ) अद्ययावत करुन तपासणी करुन घेण्याबाबत.

संदर्भ :- १) परिपत्रक क्र.बीसीसी/१६/७४/१९९८ दि. १० मार्च, १९९८.
२) परिपत्रक क्र.वि.क./०४/२००९ दि. २ जानेवारी, २००९.
३) परिपत्रक क्र.वि.क./४७८/२००९ दि. १७ डिसेंबर, २००९.
४) परिपत्रक क्र.वि.क./३१२/२०१० दि. ८ ऑक्टोबर, २०१०.

सर्व अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक, संलग्नित अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन संस्था व तत्सम महाविद्यालये (अल्पसंख्यांक महाविद्यालये वगळुन). तसेच उपकुलसचिव आस्थापना व अध्यापक नियुक्ती विभाग यांना कळविण्यात येते की, संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरताना शासनाने निर्गमित केलेले शासननिर्णय दिनांक २९ मार्च, १९९७ व १८ ऑक्टोबर, १९९७ मधील तरतुदीनुसार बिंदुनामावल्या अद्ययावत करुन शासन परिपत्रक दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ नुसार तपासून, त्यानुसार पदे भरण्याची कार्यवाही करण्यात यावी असे आदेश संदर्भिय परिपत्रक क्र ३ नुसार निर्गमित केलेले आहेत.

तसेच संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे सरळसेवा व पदोन्नतीने भरताना आरक्षणाबाबतचे निकष लावण्यासाठी विशेष कक्षाची मान्यता घेणे आवश्यक असुन शासनाच्या उपरोक्त आदेशाचे काटेकोरपणे पालन करावे असेही कळविले आहे.

या परिपत्रकाव्दारे आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील / महाविद्यालयातील व विभागाच्या अखत्यारितील शिक्षक व शिक्षकेत्तर संवर्गातील पदे भरण्यापूर्वी आरक्षणाचे निकष लावण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर पदांच्या बिंदुनामावल्या प्रत्येक वर्षी ३१ डिसेंबर पर्यंत अद्ययावत करुन शासन परिपत्रक दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ मध्ये सूचित केलेल्या कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करुन पदे भरण्याची कार्यवाही करावी. तसेच ३१ ऑक्टोबर, २०१० पर्यंत बिंदुनामावल्या भरुन तपासण्यासाठी पाठविताना उपरोक्त संदर्भांकित परिपत्रक क्र.४ मध्ये सूचित केलेल्या कार्यपध्दतीनुसार अनुशेषाबद्दलची विषयवार माहिती पाठविण्यात यावी.

दिनांक : ०८ फेब्रुवारी, २०११
स्थळ : मुंबई

(प्राचार्य डॉ. मुरलीधर शि. कुऱ्हाडे)
प्र-कुलसचिव

क्र.वि.क./ २१ अ /२०११ दिनांक ०८ फेब्रुवारी, २०११

---

प्रती,

सर्व संस्थाचे अध्यक्ष / सचिव / प्राचार्य / संचालक, संलग्नित अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, व्यवस्थापन संस्था औषधनिर्माणशास्त्र व तत्सम महाविद्यालयांचे प्राचार्य (अल्पसंख्यांक महाविद्यालय वगळुन) तसेच, उपकुलसचिव, आस्थापना विभाग व उपकुलसचिव अध्यापक नियुक्ती विभाग.

प्रत माहितीसाठी :

१) मा. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे - १.
२) मा. संचालक (तंत्रशिक्षण), तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.
३) मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) मुंबई विभाग, मुंबई.
४) मा. सहसंचालक (उच्च शिक्षण) कोकण विभाग शासकीय अध्यापक महाविद्यालय आवार, पनवेल, जिल्हा - रायगड.

यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी कृपया संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी सर्व बिंदुनामावल्यांची शासन परिपत्रक दिनांक ५ नोव्हेंबर, २००९ नुसार अंतिम तपासणी झाल्याशिवाय ना हरकत प्रमाणपत्र देण्यात येवू नयेत.

(प्राचार्य डॉ. मुरलीधर शि. कुऱ्हाडे)
प्र-कुलसचिव